महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

क्र.संवैशिवसं/स्पर्धा परिक्षा-२३/कागदपत्र पडताळणी/२०२४ दि.०७/०८/२०२४

# नोटीस

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/होमीओपॅथीक महाविद्यालय व रुग्णालयातील तसेच मानसिक आरोग्य केंद्र विभागांतर्गत गट-क तांत्रिक /अतांत्रिक व परिचर्या संवर्गातील रिक्त पदांसाठी सरळसेवा स्पर्धा परिक्षा टी.सी.एस-आय.ओ.एन कंपनीमार्फत दि.१२ जून, २०२३ ते २० जून २०२३ या कालावधीत विविध जिल्ह्याच्या ठिकाणी घेण्यात आली होती.

सदर परिक्षेतील गट-क तांत्रिक संवर्गातील प्रयोगशाळा सहाय्यक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ व समाजसेवा अधिक्षक या संवर्गातील **अंशकालीन** उमेदवारांचे कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणी करणे आवश्यक असल्याने गुणवत्ता यादीमधील उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी उपलोड केलेली मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतिसह पडताळणीकरीता खालील नमूद दिनांक व वेळी उपस्थित रहावे. यापुर्वी ज्या उमेदवारांची प्रमाणपत्रे पडताळणी झालेली आहे अशा उमेदवारांनी पुन:श्च पडताळणीकरीता उपस्थित राहू नये.

**स्थळ - संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

| अ.क्र | पदनाम | सामाईक गुणवत्ता यादी क्रमांक | | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (अंशकालीन सर्व प्रवर्ग) | ३१९ | १८४६ | सोमवार दि.१२/०८/२०२४ (११.०० ते ५.३० वाजेपर्यंत) |
| २ | प्रयोगशाळा सहाय्यक (अंशकालीन सर्व प्रवर्ग) | ३१७ | ९३६ | |

सूचना :-

ज्या उमेदवारांनी अंशकालीन या प्रवर्गातून ऑनलाईन अर्ज भरलेला आहे, अशा उमेदवारांकडे शासन परिपत्रक : रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्रमांक इएसई-२००३/प्र.क्र.४८/रोस्वरो-१, दि.०७ मार्च, २००३ नूसार तहसिलदार यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ज्या उमेवारांकडे सदरचे प्रमाणपत्र उपलब्ध असेल अशा उमेवादरांनाच कागदपत्र पडताळणीकरीता प्रवेश दिला जाईल व ज्या उमेदवाराकडे सदरचे प्रमाणपत्र उपलब्ध नाही, अशा उमेदवारांची पडताळणी न करता त्यांना अपात्र समजण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष